# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सुर्या प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१) २९६० (१५-०१-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, डहाणू, विक्रमगड (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी सिंचनाखाली आणण्यासाठी १९७२ साली डहाणू तालुक्यातील धामणी येथील सुर्या नदीवर धरण बांधण्यात सुरुवात झाली असून, सदरहू प्रकल्पाचे काम आजही अपूर्णावस्थेत असल्याने पालघर तालुक्यातील पूर्वेकडील अनेक गावांना सिंचनापासून वंचित व्हावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुर्या प्रकल्पाची या भागातील सर्व कार्यालये १० वर्षापूर्वी बंद केली असून सदरहू कार्यालय शहापूर तालुक्यातील भातसा प्रकल्प कार्यालयाला जोडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पालघर पूर्वेकडील कालव्यांची कामे अद्यापी अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर अपूर्णावस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

एकूण १४६९६ हेक्टर प्रकल्पिय सिंचन क्षेत्रापैकी १२४९० हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती पूर्ण झाली आहे.

(२) हे खरे नाही. प्रकल्पाची उर्वरित कामे व शेतकऱ्यांच्या अडचणींचा विचार करुन नजीकच्या भातसा प्रकल्पाकडे २००८ मध्ये ही कामे सोपवली आहेत.

(३) पर्यायी वनजमीन वळते करण्याची प्रक्रिया झाली नसल्याने कामे बंद आहेत.

(४) धरणाचे बुडीत क्षेत्र १०९५.४०९ हे. च्या अनुषंगाने वनजमीनीपोटी नक्त वर्तमान मुल्य (N.P.V.) रक्कम रुपये ८५.०० कोटी वन विभागास दि.२८/७/२००९ रोजी भरणा करण्यात आली

आहे. पर्यायी वनीकरण व दंडणीय रक्कम पोटी रु १६.२३ कोटी देणे अद्याप बाकी आहे. तसेच कालव्यासाठी १९५.२६५ हे. क्षेत्राच्या अनुषंगाने रुपये १४.२५५ कोटी रक्कम भरण्यात आली आहे.

वनजमीन वळते झाल्यावर व खाजगी भूसंपादन पूर्ण झाल्यावर डावा कालवा कि.३४ ते ४७ ची कामे सुरु करण्यात येतील.

---

**कल्याण-डोंबिवली महापालिकेस पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचा पुरवठा खुप कमी प्रमाणात करण्यात येत असल्याबाबत**

**(२) ४०८१ (२३-१२-२०१४). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेस पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचा पुरवठा खुप कमी प्रमाणात करण्यात येत असलेल्या तक्रारी शासनास प्राप्त झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महापालिके अंतर्गत खूप मोठ्या प्रमाणावर इमारातींचे बांधकाम झाल्यामुळे तसेच लोकसंख्येची घनता निर्माण झाल्यामुळे पाण्याचा वापर खूप मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे पाण्याची कमरतता भासत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कल्याण-डोंबिवली महापालिकेने संबंधितांना पाण्याची जास्तीची मागणी केलेली असल्यानंतरसुध्दा पाण्याचा पुरवठा कमी करणे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे काय नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

उल्हास खोऱ्यात पिण्याच्या पाण्याची मागणी ही सध्या उपलब्ध होणाऱ्या पाण्यापेक्षा जास्त आहे.

(३) होय,

दरवर्षी उल्हास नदी खोऱ्यामध्ये पाण्याची तूट जाणवत असल्यामुळे साधारणपणे १० ते १५ टक्के कपात करावी लागते. सन २०१४-१५ मध्ये उपलब्ध पाणी साठ्यानुसार दि. १/१/२०१५ पासून कल्याण-डोंबिवली सह सर्वच पाणी वापरकर्त्यांना १४ टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे.

(४) एम.आय.डी.सी. च्या मालकीच्या बारवी धरणाची उंची वाढवण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या अधिकच्या पाण्यातून गरजेनुसार पाणी कल्याण-डोंबिवली म.न.पा. व इतर पाणी वापर कर्त्यांना पुरविण्याबाबत शासनाचे नियोजन आहे.

---

**चंद्रपूर शहरातील नाल्यांवर पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याबाबत**

**(३) १३५१३ (०८-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील सखल भागातील वस्त्यांमध्ये उपाययोजना सुचविण्यासाठी बॅक वॉटर बाबत अभ्यास करणे आवश्यक असून हे काम आय.आय.टी.पवई मुंबई या नामांकित संस्थेला देण्यात आले असल्याचे लेखी उत्तर मा. जलसंपदा मंत्री यांनी जा.क्र. कापूर - २०१४ /प्र.क्र.१९९ /२०१४ /सि.व्य. (मा) दिनांक निरंक जुलै आणि कपासू - २०१४ /३१३ /२०१४ सि.व्य.(म) दिनांक १/८/२०१४ अन्वये स्थानिक लोकप्रतिनिधी यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने दिनांक २८ व २९ जून, २०१४ मध्ये चंद्रपूर शहरातील सखल वस्त्यांमध्ये उपाययोजना सुचविण्यासंदर्भात सर्व्हेक्षण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर शहरातील नागपूर रोड रेल्वे लाईन ते साईबाबामंदिर ते हवेली गार्डन ते जगन्नाथबाब नगर, ठक्कर कॉलनी ते सिस्टर कॉलनी ते चांभारकुंड ते रहेमत नगर ते इरई नदी पर्यंतचा ४५०० मिटर नाल्यावर पूर्ण संरक्षण भिंतीचे बाधकाम करण्याकरिता अंदाजे रुपये ८००.०० लक्ष खर्च अपेक्षित असून पंचशताब्दी निधी अंतर्गत दुस-या टप्प्यामध्ये सदर नाला बांधकाम प्रस्तावित असल्याचे लेखी उत्तर अतारांकित प्रश्न क्र. ६८२३८ अन्वये देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापही सदर नाल्यावर पुर संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही व तसेच इरई नदीच्या नागपूर रोडवरील रेल्वे पुलापासून ते इरई नदी, झरपट नाल्याच्या संगमापर्यंतच्या भागातील गाळ काढण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने उक्त नाल्यावरील ४५०० मिटर लांब पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासंदर्भात आणि इरई नदी ते झरपट नाल्यापर्यंतचे गाळ काढण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाचे सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

सदर अतारांकित प्रश्न क्र.६८२३८ ला दि.०५.१०.२०१२ रोजी नगर विकास विभागातर्फे उत्तर देण्यात आले होते.

(४) पंचशताब्दी योजनेमधुन निधी प्राप्त झालेला नसल्याने सदर नाल्यावर, पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम चंद्रपूर महानगरपालिकेने हाती घेतलेले नाही. चंद्रपूर शहराचा, शहर विकास आराखडा तयार करण्यात आला असून शहरातील मुख्य नाल्यावरील संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे अंतर्भुत करण्यात आलेचे चंद्रपूर महानगर पालिकेने कळविले आहे.

इरई नदीच्या नागपूर रोडवरील रेल्वे पूलापासून ते इरई नदी, झरपट नाल्याच्या संगमापर्यंत च्या भागातील गाळ काढण्याचे काम पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांचे कडून सुरू असून काम प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

संरक्षण भिंत बांधण्यासाठी नगर विकास विभागाला (पंचशताब्दी योजने अंतर्गत) निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे संरक्षण भिंतीचे काम महानगर पालिकेने अद्याप केलेले नाही असे चंद्रपूर महानगर पालिकेने कळविले आहे.

इरई नदीतील गाळ काढणेकरिता वेकोली, चंद्रपूर यांचेकडून रू.२.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. इरई नदी ते झरपट नाल्यापर्यंतच्या भागातील गाळ काढण्याचे काम पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांचे कडून सुरू असून काम प्रगतीपथावर आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४) ३२७१३ (२२-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील बोरी फाटा ते शिर्की, शिर्की ते शिर्की चाळ, वाशी ते वढाव, वढाव ते भाल, वाढत ते काळेश्री या रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहतूकीस अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याकरिता निधीची तरतूद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे अहे. प्रश्नांकित रस्त्यांपैकी बोरी ते शिर्की, शिर्की ते शिर्की चाळ व वढाव ते भाल हे तीन रस्ते जिल्हा परिषदेच्या मालकीचे आहेत. तर वाशी ते वढाव व वढाव ते काळेश्री हे दोन स्वतंत्र रस्ते नसून वाशी, वढाव ते काळेश्री हा एकच रस्ता असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे.

(३) व (४) अ) बोरी ते शिर्की या इतर जिल्हा मार्ग रस्त्याची एकूण लांबी ७.०० कि.मी. असून अस्तित्वातील लांबी ३.०० कि.मी. आहे. त्यपपैकी एम.एम.आर.डी.ए. योजनेअंतर्गत १.५६ कि.मी. लांबीचे काम मंजूर आहे. ब) शिर्की ते शिर्की चाळ नं. २ या ग्रामीण मार्गाची एकूण लांबी १०.०० कि.मी. असून अस्तित्वातील लांबी ८.०० कि.मी. आहे. एम.एम.आर.डी.ए. योजनेअंतर्गत १.५६ कि.मी. व पूरहानी योजनेअंतर्गत १.०० कि.मी. लांबीचे काम मंजूर आहे. तसेच ३.०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.

क) वढाव ते भाल या ग्रामीण मार्ग रस्त्याची एकूण लांबी ६.३०० कि.मी. असून अस्तित्वातील लांबी ४.८५० कि.मी. आहे. त्यापैकी खास दुरुस्ती योजनेअंतर्गत ०.४५० कि.मी. व एम.एम.आर.डी.ए. योजनेअंतर्गत ०.९०० कि.मी. लांबीचे काम मंजूर आहे.

या रस्त्यांच्या उर्वरीत खराब लांबीतील रस्त्यांच्या कामांची दुरुस्ती जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच वाशी, वढाव ते काळेश्री ह्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. सदर रस्ता सुस्थितीत असून वाहतुक सुरळीत आहे.

---

**कळमोडी धरणातून खेड तालुक्यातील सहा आदिवासी गावांना दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(५) ३९७१७ (०४-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमा नदीची उपनदी आरळा या उपनदीवरील कळमोडी धरणातून खेड तालुक्यातील येनिये, कुडे बु., घोटवडी, एकलहरे, शेंदुर्ली आणि धामणगाव खु. या आदिवासी गावांतील ३०५ हे. क्षेत्रासाठी दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी पुरवठा करण्याचे शासनाच्या विचारधीन असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. जलसंपदा व जलसंधारण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली असून याबाबत मा.जलसंपदा व जलसंधारण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर उपसा सिंचन योजनेचे क्षेत्र १८० हेक्टर व १२५ हेक्टर इतके म्हणजेच २५० हेक्टर पेक्षा कमी असलेने सदर योजना जलसंधारण विभागाचे कार्यकक्षेतील आहे. दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या मा. राज्यमंत्री यांच्या बैठकीतील निर्णयानुसार सदरचा उपसा सिंचन योजना प्रस्ताव व अनुषंगिक कागदपत्रे इ. कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, पुणे - ०६ यांचेकडे संबंधित कार्यकारी अभियंता, भामा आसखेड धरण विभाग यांनी पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये हस्तांतरीत केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परळी (जि.बीड) तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना सोयी-सुविधा मिळण्याबाबत

**(६) ४२८६० (३०-०४-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि.बीड) तालुक्यातील ग्रामपंचायतीचे ३,५०० कर्मचारी मागील अनेक वर्षापासून राहणीमान भत्त्यापासून वंचित राहिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परळी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सोयी-सुविधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :** (१) नाही.

(२) परळी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी यांना शासन निर्णयानुसार किमान वेतनाचे अनुदान देण्यात आले आहे. तसेच कामगार आयुक्त यांनी निश्चित केलेल्या दराप्रमाणे ग्रामनिधीतून राहणीमान भत्ता देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### साक्री तालुक्यातील लाटीपाडा धरणाच्या उजव्या कालव्याच्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावाबाबत

**(७) ४५५०८ (३०-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील लाटीपाडा धरणाच्या उजव्या कालव्याच्या विस्तारीकरणाचा प्रस्ताव शासनाकडे बऱ्याच दिवसापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लांबी २१ कि.मी. ते २८ कि.मी. पर्यत वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१६) :** (१) नाही.

(२) विस्तारीकरणाच्या कामास १९८२ मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान आहे. उपलब्ध अनुदानातून मुख्य कालवा कि.मी. २१ ते २८ मधील वाढीव मुख्य कालव्याचे मातीकाम व वितरीका क्र. १७ चे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरीत विस्तार सुधारणांचे कामांचे अंदाजपत्रके सक्षम स्तरावर प्रशासकीय मंजूरी घेऊन निधी उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.माधवराव चितळे समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीबाबत**

**(८) ५५५३२ (२०-०८-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिंचनासंदर्भात शिफारशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या डॉ.माधवराव चितळे समितीने सादर केलेल्या अहवालातील प्रमुख शिफारशी काय आहेत,

(२) असल्यास,या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :** (१) सिंचन विषयक विशेष चौकशी समितीने (चितळे समिती) दिलेल्या अहवालात विविध महामंडळामधील प्रकल्पांमध्ये झालेल्या अनयिमिततांबाबत जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याबाबत सुचविण्यात आले आहे. तसेच प्रकल्प ठरलेल्या मुदतीत व खर्चात पूर्ण करण्याकरीता व सिंचन क्षेत्रात वाढ होण्यासाठी ४२ सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्यातील प्रमुख शिफारसी पुढीलप्रमाणे आहेत.

अ) बिगर सिंचन पाणीवापर सतत वाढत जाणार असल्यामुळे त्यावर १०० टक्के प्रक्रिया करण्याची जबाबदारी नगरपालिका व उद्योग यांचेवर टाकण्याचा कायदा करुन त्याची कठोर अंमलबजावणी प्रथम प्राधान्याने तुटीच्या व अतितुटीच्या खोऱ्यांमध्ये करावी.

ब) लाभक्षेत्रातील संपूर्ण क्षेत्रातील विहिरींवरील पाणीपट्टी आकारणी रद्द न करता केवळ पाणीवापर संस्थांकडे हस्तांतरित झालेल्या क्षेत्रातील विहीरीवरील पाणीपट्टी आकारणी रद्द करावी.

क) प्रकल्पांची वास्तविक किंमत (मूळ किंमत + भाववाढ) हीच प्रशासकीय मान्यता किंमत समजावी व त्यानुसार किंमतवाढ १५% पेक्षा जास्त असल्यास केंद्रीय जल आयोग निकषांप्रमाणे सुप्रमा द्यावी.

ड) जलसंपदा विभागाची स्वतंत्र नियम संहिता असावी.

ई) दूरसंवेदन तंत्राने राज्यातील मोठ्या मध्यम व काही प्रतिनिधीक लघुपाटबंधारे धरणांमध्ये प्रत्यक्ष गाळांचे सर्वेक्षण करण्याचा समयबध्द कार्यक्रम राबवावा.

(२) चितळे समितीच्या अहवालात गंभीर अनियमितता निदर्शनास आलेल्या १२ प्रकल्पांबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी आदेशीत केली आहे.

कोंडाणे प्रकल्पाच्या बाबतीत ४ अधिकाऱ्यांना, बाळगंगा प्रकल्प, जि. रायगड या प्रकल्पाचे बाबतीत २ अधिकाऱ्यांना व काळू प्रकल्प जि.ठाणे बाबतीत एका अधिकाऱ्यास निलंबीत कराण्यात आले आहे. कोंडाणे प्रकल्पाबाबत ८ अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

१६ दोषयुक्त प्रकल्पांची छाननी व पुनर्रचना राज्य तांत्रिक सल्लागार समितीमार्फत प्रगतीत आहे.

तसेच प्रस्तावित ४२ सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी अ.मु.स (गृह) यांचे अध्यसक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या बैठकांमध्ये झालेल्या निर्णयांनुसार १४ सुधारणांबाबत कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे. उर्वरीत सुधारणांबाबत निर्णय अंतिम करण्याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील नीरा देवघर धरणाची उंची वाढविण्याबाबत**

**(९) ५५५९१ (२०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील नीरा देवघर धरणाने तळ गाठल्याने नेरे परिसरात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होऊ शकत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नीरा देवधर धरणाची उंची वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :** (१) नेरे गाव निरा देवघर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येत नाही.

निरा देवघर धरणाची १ मे, २०१६ मध्ये जलाशयाची पातळी ६३७.७० मीटर इतकी होती व एकूण पाणीसाठा ४२.५० द.ल.घ.मी. होता.
(२) निरा देवघर धरणाच्या प्रकल्पाचे जल नियोजन ५० टक्के विश्वासार्ह जलसंपत्तीवर अवलंबून असून त्यानुसार धरणाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. निरा देवघर धरणाची उंची वाढविणेबाबत प्रस्तावित नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा स्तरावरील काही कालबाह्य योजना एकाच नावाने राबविल्याबाबत**

**(१०) ५५६६१ (१९-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा स्तरावरील काही कालबाह्य झालेल्या योजना एकाच नावाने राबविल्या जात असून ज्या योजना कार्यान्वित नाहीत अशा योजना बंद करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सर्व योजनांचा आढावा घेऊन शासनाला शिफारस करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली असून समितीच्या अहवालानंतर कोणत्या योजना पुढे चालू ठेवायच्या व कोणत्या योजना बंद करावयाच्या याबाबत अंतिम निर्णय शासनाने घेतला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणत्या योजना कार्यान्वित करणार आहेत वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-१०-२०१६) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधील जिल्हा योजनांची संख्या कमी करण्यासाठी आढावा घेऊन व अभ्यास करुन शासनाला शिफारस करण्यासाठी शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. डिएपी-१०१६/प्र.क्र. ८१/का. १४८१, दि. २८/४/२०१६ अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने शासन निर्णयाच्या दिनांकापासून ६ महिन्यांत (दि.२७/१०/२०१६ पर्यंत) आढावा घेऊन व अभ्यास करुन अभिप्राय व सूचनांसह समितीचा अहवाल शासनास सादर करणे अभिप्रेत आहे.

(३) ते (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात पेट्रोल व डिझेलवर प्रति लिटर २ रुपये दुष्काळ कर लावल्याबाबत**

**(११) ५५६६९ (२९-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने राज्यातील दुष्काळी स्थितीचा सामना करण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलवर प्रति लिटर २ रूपये दुष्काळ कर लावण्यात आलेला असून त्याप्रमाणे नागरिकांना कडून वसूल सुध्दा करण्यात येत असल्याची माहिती माहे माहे ५ जून २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात लावलेल्या पेट्रोल-डिझेलवरील दुष्काळ करादवारे १,३३७ कोटी रुपये जमा झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेट्रोल व डिझेलवर दुष्काळ कर लावल्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दुष्काळ कर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-१०-२०१६) :** (१) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ पासून पेट्रोल व डिझेल वर रु. २ प्रतिलिटर कराचा दर वाढविण्यात आला.
(२) माहे ऑक्टोबर, २०१५ ते मार्च २०१६ कालावधीमध्ये पेट्रोल व डिझेलवर आकारलेल्या रुपये २ प्रतिलिटर कराद्वारे रु. ११२८ कोटी जमा झाले आहेत.
(३) अन्नधान्याच्या किंमतीत वाढ झाली असे अनुमान काढणे शक्य नाही.
(४) १ ऑक्टोबर, २०१५ पासून पेट्रोल व डिझेल, देशीविदेशी मद्य, सिगारेट, शितपेये, सोने, हिरे इ. चे दागिने, नकली दागिने यावर करवाढ केली होती. बळीराजाच्या अडचणी दूर करण्याकरिता आर्थिक तरतूदीची आवश्यकता असल्यामुळे, सदर करवाढ आणखी एक वर्ष सुरु ठेवणार असल्याचे वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केले आहे.
(५) लागू नाही.

---

## कोयना धरणातील वीज निर्मितीनंतर समुद्रात सोडले जाणारे पाणी मुंबईत आणण्यासाठी अभ्यासगटाची स्थापना करण्याबाबत

**(१२) ५५६९४ (२३-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना धरणातील वीज निर्मितीनंतर समुद्रात सोडले जाणारे पाणी मुंबईत आणता येईल काय, याचा अभ्यास करण्यासाठी एका अभ्यासगटाची स्थापना करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभ्यास गटाची रचना व कार्यकक्षा काय आहे तसेच अभ्यासगटाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणता निर्णय घेण्यात आला असून यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
कोयना जलविद्युत केंद्रामधून विद्युत निर्मितीनंतर वशिष्ठी नदीत सोडण्यात येणाऱ्या अवजलाचा वापर करून तसेच अन्य पर्यायी स्त्रोतातून, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्याच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी शासन निर्णय क्र. विसस-२००५-(९७/०५) जसंनि, मंत्रालय मुंबई दिनांक २५.१०.२००५ अन्वये श्री.म.दि.पेंडसे, निवृत्त सचिव, जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट नियुक्त करण्यात आला होता.

(२) कोयनेच्या विद्युत निर्मितीनंतर वशिष्ठी नदीत सोडण्यात येणारा अवजलाचा वापर करून अथवा पर्यायी स्त्रोतातून रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्याच्या संदर्भातील अभ्यास करण्यासाठी श्री.म.द.पेंडसे, निवृत्त सचिव, जलसंपदा विभाग-अध्यक्षतेखाली डॉ.श्री. श्रीरंग, श्री.भा.कद्रेकर, माजी कुलगुरू, डॉ.बा.सा.कोकण, कृषि विद्यापीठ, दापोली मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोकण विभाग, उप संचालक, भूजल सर्वेक्षण, कोकण विभाग या सदस्यांचा आणि अधीक्षक अभियंता, कोकण पाटबंधारे मंडळ, रत्नागिरी सदस्य सचिव यांचा स्वतंत्र अभ्यास गट नियुक्त करण्यात आला होता.

(३) कोयना अवजलाचा वापर करण्याच्या अनुषंगाने केलेल्या अभ्यासगटाचा अहवाल मा.मंत्री जलसंपदा दि.२७/०९/२००६ रोजी सादर करण्यात आला होता.

शासनाकडे प्राप्त अहवालाकडे कार्यवाही करण्याबाबत दिनांक ०६.०८.२०११ शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंता (जसं) व सह सचिव यांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्या उपसचिवांचा समावेश असणारी शक्ती प्रदान समिती गठीत करण्यात आली होती. त्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर शक्ती प्रदान समितीने सादर केलेल्या अहवालास मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.१६/०७/२०१५ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

### धुळे जिल्हयात निर्माण झालेली पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(१३) ५५७७२ (२३-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील जलसाठ्यामध्ये केवळ १० टक्केच पाणीसाठा शिल्लक असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे जिल्हयात निर्माण झालेली पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :** (१) धुळे जिल्हयातील मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये मे, २०१६ अखेर १५.३१% उपयुक्त पाणीसाठी उपलब्ध होता.

(२) धुळे जिल्हास्तरीय पाणी आरक्षण समितीने दिनांक ३१.७.२०१६ पर्यतच्या पिण्याच्या गरजेच्या अनुषंगाने पाणी आरक्षित केले होते. धुळे जिल्हयातील प्रकल्पांमध्ये दिनांक ७/९/२०१६ रोजी ५३.११% उपयुक्त पाणीसाठी उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात मागेल त्याला शेततळे योजनेत प्राथमिक स्थरावर केल्या जाणा-या जागा निश्चितीच्या कामात होत असलेला गैरकारभार**

**(१४) ५५८२० (२९-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात मागेल त्याला शेततळे योजनेत प्राथमिक स्थरावर केल्या जाणाऱ्या जागा निश्चितीचे नियम डावलून कृषी अधिकारी कार्यालयात बसूनच जागा निवड करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी स्थळभेटी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) मार्गदर्शक सुचनेप्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ९८ जलसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कर्ज व कर्जरोखे यांच्यामार्फत निधी उभारण्याबाबत**

**(१५) ५५८३४ (०१-०९-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९८ जलसिंचन प्रकल्पांना शासनाने सुधारित मान्यता दिली असून सर्व योजना पूर्ण करण्यासाठी आवश्यक ९० हजार कोटी कर्ज व कर्जरोखे यांच्या माध्यमातून उभारणार असल्याचे जाहिर केले आहे असे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती कोटीचे कर्जरोखे काढण्यात येणार आहेत व या कर्जरोख्यातून किती वर्षात प्रलंबित सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याबाबतचा आराखडा तयार करण्यात आला आहे,

(३) असल्यास, सर्व योजना पूर्ण करण्यासाठी कर्ज व कर्जरोखे यांच्यामार्फत निधी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) नाही. तथापि राज्य शासनाने ९९ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) नाही, तथापि राज्यातील आत्महत्याग्रस्त भागातील १०७ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रू.७१८७ कोटी व दुष्काळी भागातील ७ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रू.३५०० कोटी एवढया रक्कमेचा विशेष पॅकेजचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेस्तव सादर केला आहे.

प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना-वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट २६ मोठया व मध्यम प्रगतीपथावरील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन रू.३८३० कोटी केंद्रीय सहाय्य व रू.१२७७३ कोटी केंद्र शासनाच्या माध्यमातून माफक व्याज दरात कर्ज सहाय्य उपलब्ध करणार आहे.

प्रकल्पांसाठी कर्जरोख्याद्वारे निधी उभारण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर रस्ते खडीमल येथे कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाने केलेला गैरव्यवहार

**(१६) ५५८३७ (११-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर रस्ते खडीमल येथे कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाने कंत्राटदाराला कमिशनच्या मोबदल्यात विकले असल्याचे माहे मे,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामसेवकावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१६) :** (१) नाही.

ग्रामपंचायत खडीमल येथे व अंतर्गत गावामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रोडची एकूण चार कामे करण्यात आली असून सदर कामे पूर्ण झालेली आहेत. त्यानुसार कामांचा पुर्णत्वाचा दाखला, मोजमाप पुस्तकामध्ये मुल्यांकनाची नोंद व क्वालीटी कंट्रोल प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ९ हजार ६३ ग्रामपंचायतीने रोजगार हमी योजनेच्या कामाकडे दुर्लक्ष केल्याबाबत**

**(१७) ५५९०२ (११-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९ हजार ६३ ग्रामपंचायतीने रोजगार हमी योजनेच्या कामाकडे दुर्लक्ष करीत असल्याची माहिती माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार रोजगार हमी योजनेची काम पारदर्शक व सुरळीत होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-१०-२०१६)** :(१) हे खरे आहे. मार्च, २०१६ अखेर ९०७३ ग्रामपंचायतींमध्ये मगांराग्रारोहयो अंतर्गत खर्च निरंक असल्याचे दिसून आले आहे.

(२) नाही. मगांराग्रारोहयो ही योजना मागणी आधारित असल्यामुळे बऱ्याचशा ग्रामपंचायतींमध्ये शेल्फवर कामे उपलबध असूनही कामाची मागणी न आल्यामुळे तसेच अनेक ग्रामपंचायतींअंतर्गत कामे न झाल्यामुळे खर्च निरंक दिसून आले आहे.

(३) मजूरांनी मगांराग्रारोहयोच्या कामांवर यावे यासाठी प्रचार प्रसिध्दी करण्यात येते. तसेच आयुक्तालयामार्फत सर्व जिल्ह्यांना ज्या ग्रामपंचायतींमध्ये एकही नरेगा अंतर्ग काम हाती घेण्यात आलेले नाही त्यामध्ये तातडीने एकतरी मजूर प्रधान काम हाती घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच याकरिता सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून आजपर्यंत निरंक खर्च असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या ८८३० इतकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विविध विभागांतर्गत ५५ उपक्रम-महामंडळे कार्यरत असून त्यापैकी २५ उपक्रम तोट्यात चालत असल्याबाबत**

**(१८) ५५९०७ (११-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध प्रशासकीय विभागांतर्गत सुरु असलेल्या ५५ उपक्रमांपैकी ६ उपक्रम ना-नफा ना-तोटा या तत्वावर तर २५ उपक्रम तोट्यात सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील महामंडळे सुस्थितीत व नफ्यामध्ये चालविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :** (१) व (२) विविध प्रशसकीय विभागाच्या अखत्यारित एकूण ५५ राज्य सार्वजनिक उपक्रम आहेत. हे सार्वजनिक उपक्रम विविध उद्देशांकरीता शासनाने वेळोवेळी स्थापन केलेले आहेत. या ५५ राज्य सार्वजनिक उपक्रमांपैकी २४ उपक्रम नफ्यात कार्यरत असून ६ उपक्रम ना-नफा ना-तोटा तत्वावर कार्यरत आहेत. उर्वरीत २५ सार्वजनिक उपक्रम तोट्यात चालत आहेत. व या तोट्यातील उपक्रमांसंदर्भात राज्य शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे :-

१. कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ पुनरुर्ज्जिवित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.
२. (१) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, (२) विदर्भ विकास महामंडळ, (३) मराठवाडा विकास महामंडळ, (४) कोकण विकास महामंडळ, (५) भू-विकास महामंडळ, (६) मेल्ट्रॉन व (७) मॅफको लि. हे तोट्यातील सार्वजनिक उपक्रम बंद करण्याचा निर्णय शासनाने सन २००१ ते २००५ या कालावधीत वेळोवेळी घेतलेला आहे. या उपक्रमांच्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागामार्फत सुरु आहे.
३. उर्वरीत १७ राज्य सार्वजनिक उपक्रमांचा आढावा मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दि. ५/४/२०१६ च्या बैठकीत घेण्यात आला. उच्चाधिकार समितीने या सार्वजनिक उपक्रमांनी त्यांचा संचित तोटा टप्प्याटप्पयाने कमी करुन नफ्यात येण्याबाबतचा तसेच संचित तोटा शुन्य करण्याबाबतचा कालबध्द कृती कार्यक्रम /आराखडा तयार करण्याचे निदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभाग/सार्वजनिक उपक्रम यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
४. उपरोक्त १७ तोट्यातील उपक्रमांपैकी ४ उपक्रम सार्वजनिक उपयुक्तता या उद्देशाने आणि ६ उपक्रम हे सामाजिक क्षत्रातील मागासवर्गाच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना दोन वर्षाची बालसंगोपन रजा देण्याबाबत**

**(१९) ५६०३६ (२४-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.रणजीत कांबळे (देवळी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना दोन वर्षाची बालसंगोपन रजा देण्याचा प्रश्न प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना दोन वर्षाची बालसंगोपन रजा लागू केली तर शासनाच्या कामावर परिणाम होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील महिला वर्गाला बालसंगोपनाची रजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-१०-२०१६) :** (१) शासकीय कर्मचारी संघटनाची दोन वर्षाची बाल संगोपन रजा मंजूर करावी अशी मागणी आहे.
(२) हे खरे आहे.
(३) बाल संगोपन रजा मंजूर केल्याने शासकीय कामकाजावर होणारा एकंदरीत परिणाम पाहता सरसकट सर्व महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजा मंजूर करणे योग्य होणार नाही या निष्कर्षात प्रत शासन आले आहे. तथापि, राज्यातील विकलांग अपत्य असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना ७३० दिवसांची विशेष बालसंगोपन रजा मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय दि.२१.०९.२०१६ रोजी निर्गमित केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील वांगी-भराडी लघु सिंचन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(२०) ५६०५५ (१८-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील वांगी-भराडी लघु सिंचन प्रकल्प तब्बल १६ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प प्रलंबित असल्यामुळे या परिसरातील ५० हून अधिक गावे विकासापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या प्रकल्पातून वांगी (बु.), धानोरा, वाजोळा, सिसारखेडा, दिडगांव या पाच (०५) गावांना लाभ मिळणे अपेक्षित आहे.
(३) प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे धरणस्थळी अद्‌याप काम सुरू झालेले नाही. प्रकल्पाचा भूसंपादन प्रस्ताव दि. २७/८/२००२ रोजी जिल्हाधिकारी औरंगाबाद

यांच्याकडे पाठविण्यात आलेला असून भूसंपादनांतर्गत कलम-४ ची प्रसिध्दी दोन वेळेस झालेली आहे. परंतु शेतकऱ्यांनी दोन्ही वेळेस नोटीसा घेण्यास नकार दिल्याने नोटीसा तामील झालेल्या नाहीत. सद्य:स्थितीतही संपादन क्षेत्रात जमिनी जाणाऱ्या जमीनमालकांचा विरोध कायम असून दि.११/८/२०१५ रोजी सदरील योजना रद्द करण्यासाठी २०० स्थानिक बाधित शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे कळविलेले आहे.
(४) संपादन क्षेत्रात जमिनी जाणाऱ्या जमीनमालकांचा विरोध कायम असल्यामुळे योजनेचे काम अद्यापपर्यंत सुरू होऊ शकलेले नाही.

---

**एकरुख उपसा सिंचन योजनेसाठी जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(२१) ५६१३८ (११-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथे जिल्हा लोक न्यायालयाचा निकाल होऊन चार वर्षे झाली तरीही एकरुख उपसा सिंचन योजनेसाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला अद्याप मिळाला नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) एकरुख उपसा सिंचन योजनेसाठी जमिन संपादित केलेल्या शेतकऱ्यांची लोकअदालतीमध्ये तडजोडीने एकूण १६२ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. त्यापैकी ७६ प्रकरणातील रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यात आली आहे. उर्वरित ८६ प्रकरणातील शेतकऱ्यांचा देय रकमेचा परिगणना तक्ता महूसल यंत्रणेकडून प्राप्त न झाल्याने त्यांना रक्कम अदा करण्यात आलेली नाही. परिगणना तक्ता प्राप्त होताच सदर रक्कम संबधित शेतकऱ्यांस अदा करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोयना, दमणगंगा योजनेच्या माध्यमातून मुंबईला पाणी देण्याबाबत**

**(२२) ५६५६० (११-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना, दमणगंगा योजनेच्या माध्यमातून मुंबईला पाणी उपलब्ध करुन देणे तसेच वैतरणा धरणातील पाणी नाशिक व मराठवाड्यातील दुष्काळी भागाला देण्यासंदर्भात सुरु असलेला अभ्यास पुर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत केलेल्या अभ्यासाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) कोयना प्रकल्पातून जलविद्युत निर्मितीनंतर उपलब्ध होणाऱ्या अवजलाचा वापर मुंबई परिसरातील पाणी टंचाई दूर करण्याबाबतचा पूर्व व्यवहार्यता अभ्यास तसेच दमणगंगा खोऱ्यातील पाणी मुंबई परिसरात आणयाबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने केला आहे.

(२) अद्याप कोणतीही बाब निश्चित झालेली नाही.

अ) दमणगंगा-पिंजाळ प्रकल्प -

राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने तयार केलेल्या दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प अहवालानुसार प्रामुख्याने मुंबई शहराच्या पिण्याचे पाण्याकरिता दमणगंगा खोऱ्यातील महाराष्ट्र राज्याच्या वाट्याचे (७५ टक्के विश्वासार्हतेचे) ८८७.९६६ दलघमी पाणी महाराष्ट्रातील वैतरणा उपखोऱ्यातील पिंजाळ धरणामध्ये (बोगद्याद्वारे) आणण्यंचा प्रस्ताव असून या योजनेद्वारे मुंबइ्र शहरात पिण्यासाठी १०० टक्के विश्वासार्हतेचे पाणी देण्याचे प्रस्तावीत आहे. परंतू दमणगंगा-पिंजाळ प्रकल्प ७५ टक्के विश्वासर्हतेने संकल्पित करण्याची विनंती शासनाने एप्रिल, २०१५ मध्ये राष्ट्रीय जलविकास अभिकरणास केली आहे.

अद्यापी गुजराज शासनाबरोबर पाणी वाटपाबाबत सहमती झालेली नाही.

ब) कोयना अवजल -

कोयाना अवजल मुंबई शहर नदी जोड योजनेच्या पूर्व अर्हता अहवालानुसार पिण्यासाठी २७.७२ टीएमसी मुंबईसाठी, २.३३ टीएमसी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मार्गावरील शहरे व गावे ३५.७३ टीएमसी औद्योगिक वापर, ०.३५ टीएमसी पशुधनासाठी व १.३७ टीएमसी वहनव्यय असा वापर होणार आहे. या योजनेत ३८ मी पाणी उचलण्यासाठी ६६ मेगावॅट पंपक्षमता एकूण ४ पंप (एक राखीवसह) वार्षिक विजेची गरजे २९५ द.ल. युनिटस आहे. सदरहू प्रकल्पाचा जोडकालवा आयताकृती / ट्रॅपेझॉयडल असा संधानकाच्या लायनिंगमध्ये-वहनक्षमता १०३ घनमीटर/सेकंद केला आहे. कालव्याच्या काटछेदाची तळाची रुंदी १८ मीटर व ४.७५ मीटर पूर्ण वहन खोली इतकी आहे. कालव्याच्या संपुर्ण लांबीमध्ये एकूण १७.९५ कि.मी. लांबीचे एकूण ३ बोगदे आहेत.

प्रकल्पाची सन २००८-०९ च्या दरसूचिनुसार एकूण किंमत २२३८.५१ कोटी असून, किंमत - लाभव्यय गुणोत्तर १.८९ व प्रकल्पाचा आंतरिक परतावा (IRR) १८.६४% इतका आहे. तथापि सदर प्रकल्प अव्यवहार्य होत असलेचे राष्ट्रीय जलविकास अभिकरणास कळविणेत आले होते.

सद्य:स्थितीत शासन सुचनांनुसार सिंडको अभिकरणाने कोयना अवजल पाणी वापराबाबतचा अभ्यास नव्याने/अद्यावत करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत केलेल्या सुचनांनुसार सिडको अभिकरणामार्फत कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावंतवाडी व वेंगुर्ले तालुक्यातील खाडीलगत असलेल्या गावांमध्ये समुद्राच्या भरतीवेळी मोठ्या प्रमाणात खारे पाणी शिरुन शेतीचे नुकसान होत असल्याबाबत**

**(२३) ५६५७१ (११-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी व वेंगुर्ले तालुक्यातील खाडीलगत असलेल्या गावांमध्ये समुद्राच्या भरतीवेळी मोठ्या प्रमाणात खारे पाणी शिरुन शेतीचे मोठे नुकसान होत असल्याने येथील खारभूमी योजनांच्या नुतनीकरणाच्या कामासाठीच्या प्रस्तावांना एप्रिल, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात मान्यता दिलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत केलेल्या कामाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) तसेच सावंतवाडी व वेंगुर्ले तालुक्यातील खाडीलगत असलेल्या गावामधील शेतीचे नुकसान थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०९-२०१६) :** (१) होय.

(२) सावंतवाडी तालुक्यातील नाणोस खारभूमी योजना, धाकले खाजण खारभूमी योजना व वेंगुर्ला तालुक्यातील आरवली खारभूमी योजना अशा एकूण तीन योजनांच्या नुतनीकरणाच्या कामास शासन निर्णय दि.६/४/२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनांना अर्थसंकल्पीय तरतुदी प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) खाडी किनाऱ्याच्या बाजूच्या शेतीचे नुकसान होऊ नये म्हणून वेंगुर्ला तालुक्यातील ३२ व सावंतवाडी तालुक्यातील १४ खारभूमी योजना बांधून कार्यान्वयीत करण्यात आलेल्या आहेत. या योजनांची देखभाल दुरुस्ती निधी उपलब्धतेनुसार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील मुळा नदीवरील पूलाची झालेली दुरवस्था

**(२४) ५६५९३ (२३-०८-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे बांधण्यात आलेल्या मध्यम प्रकल्पात पाणी साठविल्यामुळे कोतुळकडे जाणारा मुळा नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने माहे जून, २०१५ पासून सदर पुलावरुन होणारी वाहतूक बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार मुळा नदीवरील पूलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. डिसेंबर, २०१५ नंतर पाणी कमी झाल्यानंतर पूलावरुन वाहतूक जुलै, २०१६ पर्यंत चालू होती.

(२) प्रत्यक्षात जागेची पाहणी कार्यकारी अभियंता यांनी केली असून सध्याचा हा पूल राज्य महामार्गावरील असून त्याची नदी तळपातळी पासून १२.०० मी. उंची आहे. परंतु घळभरणीचे दुसऱ्या टप्प्यातील कामामुळे हा पूल पाण्याखाली गेला असून तेथील वाहतूक पिंपळगाव खांड ते धामणगाव पाट या लगतच्या पर्यायी रस्त्यावरुन वळविण्यात आली आहे.

(३) या प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यतेमध्ये पुलाच्या कामासाठी रु.४ कोटीची ठोक तरतूद करण्यात आली होती. परंतु आता सदर पुलाचे सविस्तर सर्वेक्षण अन्वेषण करुन व अंदाजपत्रक तयार करुन सुधारीत प्रशासकीय मान्यतेमध्ये आवश्यक ती रु.८.०० कोटीची तरतुद प्रस्तावित केली असून प्रस्ताव मान्तेच्या कार्यवाहीत आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यतेनंतर पुलाचे बांधकाम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दुष्काळ निवारणासाठी महाराष्ट्र पाणी परिषदेने तयार केलेल्या राज्यांतर्गत आंतरखोरे पाणी परिवहन प्रस्तावाबाबत

**(२५) ५६६५२ (२०-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळ निवारणासाठी महाराष्ट्र पाणी परिषदेने तयार केलेल्या राज्यांतर्गत आंतरखोरे पाणी परिवहन प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे एप्रिल, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत घेतलेल्या निर्णयाची थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, राज्यातील दुष्काळ निवारणासाठीचे प्रकल्प लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) होय.
(२) महाराष्ट्र पाणी परिषद यांनी तयार केलेल्या राज्यांतर्गत आंतरखोरे पाणी परिवहन प्रस्ताव दिनांक ३१.०१.२०१६ रोजी पुणे येथे झालेल्या सादरीकरण बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी सदर प्रस्तावाद्वारे केलेल्या सूचनाचा विचार गोदावरी एकात्मिक जलविकास आराखडा तयार करताना करण्यात यावा. असे निदेश दिले आहेत.

दिनांक १८.०२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाहीबाबत कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद व कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.
(३) शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील कुकडी (ता.कर्जत) व वेळु (ता.श्रीगोंदे) कालव्यांच्या वितरिकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) ५६६८२ (१८-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील कुकडी (ता.कर्जत) व वेळु (ता.श्रीगोंदे) कालव्यांच्या वितरिका फुटल्याची घटना माहे मे,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कालव्यांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) वेळु (ता. श्रीगोंदा) येथील भरावास भेगा पडल्यामुळे भरावातून पाण्याची गळती होत असलेचे निदर्शनास आले. त्यामुळे वितरीकेतील पाणी पुरवठा खंडीत करुन भरावाची यांत्रिकी विभागामार्फत तातडीने दुरुस्ती करण्यात आली. पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज सुलभरित्या मिळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(२७) ५६७३१ (२३-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.पंतप्रधानांनी सुरु केलेल्या मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज देण्यास दुसरबीड (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील स्थानिक स्टेट बँक शाखा व्यवस्थापकासह इतर राष्ट्रीयकृत बँकाचे अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज सुलभरित्या प्राप्त होण्याकरिता कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित बँकाच्या व्यवस्थापकांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ मध्ये स्टेट बँकेच्या दुसरबिड शाखेच्या मुद्रा योजनेंअंतर्गत कर्ज मिळणेसाठी १० अर्ज प्राप्त झाले होते. सदर सर्व अर्जांना कर्ज मंजूरी दिली आहे. तसेच आतापर्यंत २.५० लाख इतका कर्जपुरवठा करण्यात आला आहे. चालू वित्तीय वर्षात दिनांक २०.८.२०१६ पर्यंत दुसरबिड शाखेकडे ७ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ५ अर्जांना कर्ज मंजूरी दिली असून २ अर्ज पुरेशा कागदपत्रांअभावी प्रलंबित आहेत. आतापर्यंत रुपये १.२५ लाख इतका कर्जपुरवठा करण्यात आला आहे. तसेच मुद्रा बँक योजनेअंतर्गत ४२ Saving bank overdraft accounts उघडण्यात आली आहेत.

(२) मुद्रा योजनेबाबत बँकांमध्ये माहितीफलक लावण्यात आले असून वेबसाईट वर माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. बँकेच्या अधिकाऱ्यांकडून लोकांना योग्य मार्गदर्शन केले जाते. मुद्रा योजनेंतर्गत कर्ज प्राप्तीसाठी अर्ज प्राप्त झाल्यास त्यावर बँकांकडून वेळेत कार्यवाही करण्यात येते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे निमगांव गुरु (ता.देऊळगावराजा, जि.बुलढाणा) येथील मग्रारोहयोची बंद पडलेली कामे सुरु करण्याबाबत

**(२८) ५६७५० (११-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निमगांव गुरु (ता.देऊळगावराजा, जि.बुलढाणा) येथील मग्रारोहयोची बंद पडलेली कामे त्वरित सुरु करण्याबाबत ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव गुरु यांनी दिनांक १० मे,

२०१६ रोजी वा त्यासुमारास गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देऊळगावराजा यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार या गावातील बंद असलेली मग्रारोहयोची कामे त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामपंचायत निमगांव गुरु येथे ५ शेततळे व १ शेतरस्ता खडीकरण काम शेल्फवर होते. प्राप्त तक्रार अर्जानुसार ग्रामपंचायत स्तरावरुन मजूरांची मागणी घेऊन अपूर्ण असलेले शेतरस्ता खडीकरण काम दि. १६.५.२०१६ रोजी मस्टर क्र. ३३७ ने सुरु करण्यात आले. एप्रिल महिन्यामध्ये ५० मंजूराची काम मागणी घेऊन ४१४ मनुष्यदिन निर्माण झालेले आहे, मे महिन्यामध्ये ७७ मजूरांचे काम घेऊन ५७६ मनुष्यदिन निर्माण झालेले आहे. मजूरांना कामे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच तालुका कृषि अधिकारी, देऊळगांवराजा यंत्रणेमार्फत ३ फळबागा कामे शेल्फवर घेण्यात आली आहेत. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. सरपंच, निमगांव गुरु यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) परिक्षेत्रातील मग्रारोहयो अंतर्गत काम करणाऱ्या मजूरांना थकीत मजूरी मिळण्याबाबत

**(२९) ५६८१७ (२३-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य रोजंदारी वन कामगार कृषि समिती यांनी दिनांक ९ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार, तहसिल कार्यालय सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) यांना सामाजिक वनीकरण सिंदखेडराजा परिक्षेत्रातील मग्रारोहयो अंतर्गत काम करणाऱ्या मजूरांची थकीत मजूरी मिळणेबाबत निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार या मजूरांची थकीत मजूरी तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) निवेदनात नमूद करण्यात आलेल्या सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, सिंदखेडराजा यांचेकडील रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीच्या कामावरील २१ मजुरांचे दि.११.८.२०१४ ते दि.२३.१२.२०१४ व दि.१५.३.२०१५ ते ३०.४.२०१५ या कालावधीचे मागणी पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांचे हजेरीपट काढून देण्यात आले व त्यानंतर सदरहू २१ मजूरांची मजूरी हजेरीपटानुसार MIS करून व FTO तयार करून दि.१६.९.२०१४ ते दि.१६.५.२०१५ या कालावधीत मजुरीचे प्रदान करण्यात

आलेले आहे व तसे काम निहाय मजुरांची मजूरी त्यांचे खात्यात Credit झाल्याबाबतचे MIS रिपोर्टच्या प्रती निवेदन कर्त्यांना समक्ष पुरवण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगांव (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कृष्णा नदीकाठावर असणाऱ्या रामलिंग व दत्त मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम बंद असल्याबाबत**

**(३०) ५७०४९ (१८-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगांव (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कृष्णा नदीकाठावर असणाऱ्या रामलिंग व दत्त मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम काही समाजकंटकांनी बंद पाडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील ग्रामस्थांनी बंद असलेले काम सुरु करण्याबाबत जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार यांच्याकडे लेखी निवेदन माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार गावाला पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) प्रश्नांकित रस्त्याच्या बाजूस राहणाऱ्या काही नागरिक/शेतकरी यांनी माहे मे, २०१६ मध्ये रस्त्याच्या हद्दीबाबत शंका उपस्थित करुन काम थांबविण्याची मागणी केली होती. तथापि, सदरचे काम प्रत्यक्ष बंद पाडले नव्हते.

(२) स्थानिक देवस्थान सल्लागार उपसमिती, उदगांव यांनी दिनांक ३० मे, २०१६ रोजी काम पूर्ण करण्याची मागणी केली होती.

(३) सदर रस्ता हा सरकार हद्दीतून जातो. तथापि, संबंधित शेतकरी/नागरीक यांनी गैर समजुतीमधुन काम बंद करण्याचा अर्ज दिला होता. त्यामुहे रस्त्या लागतचे शेतकरी/नागरीक व स्थानिक देवस्थान सल्लागार उप समिती यांच्या सोबत बैठक घेवून गैरसमज दूर करण्यात आला आहे. सद्या रस्त्याचे काम सुरु केले असून खडीकरणाचे काम पूर्ण झाले आहे व डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे.

(४) व (५) ग्रामपंचायत मार्फत पाणीपुरवठा सुरळीत सुरु आहे.

---

**सातारा जिल्ह्यातील कोयना धरण पायथा डावा तीर प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३१) ५७१६४ (११-०८-२०१६). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना धरण पायथा डावा तीर प्रकल्पाच्या उभारणी कामासाठी सुमारे १२०० कोटी रुपयांपैकी आतापर्यंत सुमारे ३५० ते ४५० कोटी रुपये खर्च झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण न करता कार्यालय बंद करुन स्थलांतराचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यालय स्थलांतर करण्याची कारणे काय आहेत तसेच प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-१०-२०१६) :** (१) होय हे खरे आहे.

मार्च २०१६ अखेर या प्रकल्पावर स्थापत्य कामासाठी रु. १८९.८४ कोटी व विद्युत कामासाठी रु. २२०.३१ कोटी असे एकूण रुपये रु. ४०९.७६ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

प्रकल्पावर प्र.मा. पेक्षा जास्त खर्च झाल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही होई पर्यंत प्रकल्पाचे कामे स्थगित करणे अपरिहार्य ठरले. प्रकल्प कामासाठी चे आवश्यक विद्युत व स्थापत्य विभागीय कार्यालये पूर्वी नुसार कोयनानगर व अलोरे येथे कार्यरत ओत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील डोळखांब धरणातून होत असलेली पाणी गळती थांबविण्याबाबत**

**(३२) ५७२३५ (११-०८-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील डोळखांब धरणातून तीन गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या लघुपाटबंधारे योजनेतून लाखो लिटर पाणी वाहून जात असल्याचे माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद् नुसार सदर पाणी गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :** (१) अंशत: खरे अरहे.

डोळखांब लघू पाटबंधारे योजनेच्या मुख्य विमोचकाच्या व्दारामधून साधारण ३० लि./सें. इतक्या प्रमाणात गळती होत होती.

(२) व (३) सदर धरणाच्या मुख्य विमोचकाच्या व्दाराच्या दुरुसतीबाबत विभागाच्या यांत्रिकी संघटनेने दिनांक १७/२/२०१६ रोजी पाहणी केली होती. परंतु धरणामध्ये पाणी असल्याने दुरुसतीचे काम शक्य झाले नाही.

माहे जून, २०१६ धरणातील पाणीसाठा कमी झाल्यानंतर विहिरीची साफसफाई करुन मुख्य विमोचकाचे व्दार व्यवस्थित बसवून गळतीचे प्रमाण कमी करण्यात आले आहे.

मुख्य विमोचकाची कायमस्वरुपी दुरुस्ती निधी उपलब्धतेनुसार यांत्रिकी संघटने मार्फत करुन घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाने टंचाईच्या काळात पाणी उपलब्ध करण्याकरीता तयार केलेल्या शेततळ्यांच्या सुरक्षिततेबाबत

**(३३) ५७३०१ (०१-०९-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने टंचाईच्या काळात पाणी उपलब्ध करण्याकरीता शेततळ्यांचे प्रकल्प हाती घेण्यात आले परंतु या शेततळ्यांमध्ये पडून आतापर्यंत नाशिक जिल्हयात नऊ जणांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेततळ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील काजिर्णे धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३४) ५७३४५ (१८-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील काजिर्णे धरणाच्या कामास १६ वर्षापूर्वी सुरुवात केली होती परंतु अद्यापपर्यंत अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाचे कामाची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, तद् नुसार सदर धरणाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) धरणाच्या विमोचकातील तांत्रिक अडचणीमुळे सदर प्रकल्पाचे काम सन २०११ पासून बंद होते.

सदर प्रकल्पास साठवण तलाव म्हणून दिनांक ३१/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार काम करणेसाठी आवश्यक मान्यता क्षेत्रीय स्तरावर घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार पावसाळ्यानंतर उर्वरित कामास सुरुवात करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली जिल्ह्यातील सर्व सिंचन योजना येत्या दोन वर्षात पूर्ण करण्याबाबत

**(३५) ५७३५६ (२३-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील सर्व सिंचन योजना येत्या दोन वर्षात पूर्ण करण्याबाबत मा.जलसंपदा मंत्री यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान टेंभू उपसा सिंचन योजनेतंर्गत कवठे महाकाळ कालव्यात पाणी सोडण्याच्या कार्यक्रम व पाणीपुजन प्रसंगी आयोजित शेतकरी मेळाव्यात जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व सिंचन योजना पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :** (१) होय.
(२) सन २०१६-१७ करिता टेंभू व कृष्णा कोयना या प्रकल्पासाठी प्रत्येकी रु. ८०.०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. कृष्णा - कोयना उ.सिं. योजनेकरीता प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना या स्त्रोतांमधून निधी उपलब्ध होणार असून ही योजना जून २०१९ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे. टेंभू योजनेस गती देणेसाठी नाबार्डकडून निधी उभारणी बाबत शासन प्रयत्नशिल आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील तीन मध्यम व चार लघुपाटबंधारे प्रकल्प निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) ५७३६७ (१८-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील तीन मध्यम व चार लघुपाटबंधारे प्रकल्प निधी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाना निधी पुरवून सदरचे प्रकल्प लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील प्रकल्प मुख्यत्वे पुनर्वसनाचे प्रश्न न सुटल्याने प्रलंबित आहेत.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील तीन मध्यम व चार लघु पाटबंधारे प्रकल्पांना सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात एकूण अनुक्रमे रु.२७.६१ कोटी व ७.६० कोटी इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे.

पुनर्वसनाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उचंगी धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३७) ५७३७९ (११-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उचंगी धरणाचे काम अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, तदनुसार सदर धरणाचे अपूर्ण असलेले काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) होय.

(२) भूसंपादन व पुनर्वसन कार्यवाही पूर्ण झालेखेरीज प्रकल्पाचे काम करणेस प्रकल्पग्रस्तांचा विरोध आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम सन २०१० पासून बंद आहे.

(३) भूसंपादन व पुनर्वसन कामे मार्गी लागणेसाठी विविध स्तरावरुन बैठकांद्वारे पाठपुरावा करणेत येत आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांची कामे करण्यासाठी सहमती प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणेत येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कन्हाळ (ता.बिलोली, जि.नांदेड) या महसूली गावास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत**

**(३८) ५७८०१ (२३-०८-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कन्हाळ (ता.बिलोली, जि.नांदेड) या महसूली गावास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबतच्या प्रस्तावास विलंब झाल्यामुळे विलंब करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याविरुध्द जबाबदारी निश्चित करुन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक ३ मार्च, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड यांना कळविले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्वतंत्र ग्रामपंचायतीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी सदरच्या प्रस्तावास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व मौजे कन्हाळ गावास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयानुसार ज्या गावी स्वतंत्र गामपंचायत स्थापन करावयाची आहे. त्या गावाची लोकसंख्या २००० असणे आवश्यक आहे. आदिवासी किंवा तांडा या भागासाठी तसेच, दोन गावात तीन कि.मी. पेक्षा अधिक अंतर असल्यास अशा गावाची लोकसंख्या १००० असणे आवश्यक आहे. तसेच, सदरील शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीची निवडणूक होऊन दोन वर्षाच्या कालावधीपर्यत ग्रामपंचायतीचे विभाजन/एकत्रिकरण करता येत नाही. सन २०११ च्या जनगणनेनुसार कन्हाळ या महसूली गावाची लोकसंख्या ३८५ इतकी असून, मौ.मेकली-कन्हाळ या गट ग्रामपंचायतीची निवडणूक २५.७.२०१५ रोजी झालेली आहे. उक्त शासन निर्णयातील निकषांची पूर्तता होत नसल्यामुळे मौ.मोकली-कन्हाळ या गट ग्रामपंचायतीचे विभाजन करुन कन्हाळ या महसूली गावी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याने उत्पन्नात वाढ करुन अनावश्यक तसेच अनुत्पादक खर्च कमी करण्याबाबत**

**(३९) ५८०३१ (०१-०९-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक नागरीकांच्या डोक्यावर २१ हजार रुपयाचे कर्ज असल्याचे कॅगने नमुद केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याने स्वत:च्या उत्पन्नात वाढ करुन अनावश्यक तसेच अनुत्पादक खर्चाला निर्बंध घालने गरजेचे असल्याचे या अहवालात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅगच्या अहवालात नमुद केल्याप्रमाणे राज्यातील नागरीकांवरचा कर्जाचा भार कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-१०-२०१६) :** (१) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल (३१ मार्च २०१५ रोजी संपलेले वर्ष) या अहवालात दरडोई कर्जाची रक्कम २०१४-१५ मध्ये रु.२१,१२५.८९ इतकी नमूद केली आहे.

(२) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल (३१ मार्च २०१५ रोजी संपलेले वर्ष) या अहवालात "साधनातील दरी सांधण्यासाठी राज्याने त्यांच्या स्त्रोतांना चालना देण्यात सुधारणा करावी तसेच अनुत्पादक खर्चास लगाम घालावा" असे नमुद केले आहे.

(३) राज्याचे उत्पन्न वाढण्यासाठी कर व करेतर महसुलात वाढ करण्याबाबत वेळोवेळी मा.मुख्यमंत्री /सचिव स्तरावर आढावा घेऊन सूचना दिल्या आहेत. अनावश्यक तसेच अनुत्पादक खर्च कमी करण्यासंदर्भात दिनांक ०२.०६.२०१५, दिनांक २३.०९.२०१५ दिनांक १७.११.२०१५ व दिनांक १६.०९.२०१६ च्या शासन आदेश / परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नरखेड (जि.नागपूर) येथील जाम प्रकल्पाच्या कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४०) ५८०७८ (११-०८-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) येथील जाम प्रकल्प गत ३० वर्षापासून प्रलंबित असल्याचे व येथील कालव्याची देखभाल व दुरुस्ती वेळोवेळी होत नसल्यामुळे कालव्यातून मोठ्या प्रमाणात पाणी झिरपत असून लाखो लीटर पाणी वाया जात असल्याचे माहे जुन, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नरखेड तालुक्यातील जाम, वर्धा व इतर नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या फळ्या वेळेवर बंद होत नसल्यामुळे पाणी क्षमतेप्रमाणे साठविले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, जाम, वर्धा व इतर नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्यांची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :** (१) नाही, हे खरे नाही.

जाम नदी प्रकल्पाच्या कामास १९८४-८५ मध्ये सुरुवात करण्यात येवून १९९६ मध्ये पूर्ण झाले. सन १९९७ पासून प्रत्यक्ष सिंचन करण्यात येत असून लाभक्षेत्रातील वितरण प्रणालीतील गाळ, गवत साफसफाई कामे यांत्रिकी विभागाच्या यंत्रसामुग्रीद्वारे करण्यात आलेली आहे. त्यामुळे कालव्यातून पाणी झिरपणे कमी झाले असून कालव्याच्या पूच्छ भागातील शेतीपर्यंत मागणीनुसार पाणी पोहचले आहे.
(२) अंशतः खरे आहे.

नरखेड तालुक्यातील जाम, वर्धा व इतर नदीवर एकूण सहा को.प.बंधारे असून बंधाऱ्याच्या नादुरुस्त फळ्या यांत्रिकी विभागामार्फत दुरुस्त करण्यात येत आहे. या सर्व बंधाऱ्यामध्ये पावसाळ्यानंतर फळ्या टाकून पाणी साठविण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे.
(३) या प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडून फळ्यांची तपासणी करण्यात आलेली आहे. पाणी साठविणेकरीता आवश्यक फळ्यांपैकी अनेक फळ्या नादुरुस्त असल्याने त्यांची दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करण्याचे नियोजित आहे.
(४) निधी उपलब्धतेनुसार जाम व इतर को.प.बंधाऱ्याच्या देखभाल दुरुस्तीची कामे करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या जीवनोन्नती अभियानाला बँकाकडून बचतगटांना कर्ज मंजूर करण्याबाबत**

**(४१) ५८१४८ (२३-०८-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या जीवनोन्नती अभियानाला बँकाकडून बचतगटांना कर्ज मंजूर होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या गैरकारभारामुळे बचतगटांना या अभियानाचा फायदा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०१५-१६ मध्ये मुल्यवर्धित कराची वसुली करण्याबाबत**

**(४२) ५८१९० (२३-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१५-१६ मध्ये व्हॅट (मुल्यवर्धित कर) वसुलीचे उद्दिष्ट साध्य झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच मागील तीन वर्षातील जिल्हानिहाय मूल्यवर्धित कराची वसुली किती आहे,
(३) असल्यास, ही तूट भरुन काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-१०-२०१६) :** (१) होय, खरे आहे.
(२) सदरहू माहिती विभागानिहाय गोळा करण्यात येते.
वर्ष निहाय वसुली तक्ता खालीलप्रमाणे :-

| DIVISION | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| | Target Achieved | Target Achieved | Target Achieved |
| Mumbai | ३७८५३.६८ | ४०१९३.३३ | ४१४८०.१९ |
| Thane | १८८८.३२ | २१६३.८६ | २४३९.८९ |
| Thane Rural | ८०५.८२ | ६७७.७२ | ७८१.१३ |
| Raigad | २६८१.०५ | ३२२७.४४ | ३५५३.२३ |
| Pune | ७९९४.५० | ८७०७.०२ | ९३३७.०६ |
| Solapur | ३७९.७६ | ४७९.८१ | ५४१.६६ |
| Kolhapur | १४३३.१३ | १६२५.८६ | १६८१.२० |
| Nasik | २७४२.४६ | २९८६.०० | ३२४७.४९ |
| Dhule | ५८१.२२ | ५८७.७५ | ५६०.६५ |
| Aurangabad | २२०७.३४ | २४७४.८६ | २२१३.५२ |
| Nagpur | २८१५.७३ | ३२०९.१५ | ३४९८.४३ |
| Amravati | ४८३.४९ | ५४७.०९ | ५०२.८४ |
| Nanded | ३३५.६६ | ३६२.२५ | ३९२.२१ |
| TOTAL | **६२२०२.१५** | **६७२४२.१५** | **७०२२९.४९** |

(३) शासनाने तूट भरुन काढण्याबाबत केलेली कार्यवाही :-

i) शासनाने काही विशिष्ट वस्तूच्या कर दरात खालीलप्रमाणे वाढ केलेली आहे :-

१. दि.०१.१०.२०१५ पासून मौल्यवान रत्ने व धातू यावरील कराचे दर १.२% केलेला आहे.
२. दि.०१.१०.२०१५ पासून परकीय मद्य यावरील कराचे दर ५०% वरुन ६०% तसेच पेट्रोल व डिझेल यावरील कराचे दर २ रु प्रति लिटर वाढविण्यात आले आहेत.
३. तसेच दि.०१.१०.२०१५ पासून सुगंधित अल्कोहोलरहीत पेयांवरील (शीतपेय) कराचे दर २०% वरुन २५% व सिगारेटस् वरील कराचे दर २५% वरुन ३५% केलेले आहेत.

ii) करकसूरदार व्यापाऱ्यांची संख्या न्यूनतम करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

iii) अपील प्रकरणे सत्वर निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले.

iv) अधिकारीनिहाय साप्ताहिक /मासिक आढावा बैठका तसेच आकस्मिक भेटीद्वारे नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील बॅरेजेसच्या कामासाठी संपादित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत

**(४३) ५८३९७ (२६-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील मांजरा नदीवर बांधण्यात आलेल्या धनेगाव, शिवणी, टाकळगाव-देवळा व साई येथील बॅरेजेससाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना त्वरित वाटप करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक ०४ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे आढावा बैठकीत निवेदनाद्वारे केली,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार संपादित जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

मांजरा नदीवरील धनेगाव, शिवणी, टाकळगाव-देवळा बॅरेजेससंदर्भात जिल्हाधिकारी, लातूर कार्यालयात दि.४/६/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे निवेदन दिले. तसेच साई उच्च पातळी बंधारा, ता.जि.लातूर साठी संपादित जमिनीचा मावेजा देणेबाबत दि.२.६.२०१६ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) (i) साई उच्च पातळी बंधाऱ्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा अंतिम मावेजा मोबदला वाटपासाठी रु.३४.७४ कोटींची निधीची आवश्यकता आहे.

(ii) शिवणी उच्च पातळी बंधाऱ्यासाठी संपादित केलेल्या जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून, थेट खरेदीने भूधारकांच्या आक्षेपांचे निराकरण प्रगत आहे व मावेजा वाटपासाठी रु.२६.०० कोटींची आवश्यकता आहे.

(iii) टाकळगांव-देवळा बंधाऱ्यासाठी संपादित केलेल्या जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून नवीन भूसंपादन कायदा अधिनियम, २०१३ अन्वये कार्यवाही जिल्हा स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(iv) धनेगाव उच्च पातळी बंधाऱ्याचे एकूण संपादित क्षेत्र २२४.७९ हे. पैकी ११.९८ हे. चा मावेजा वाटप, ६०.१९ हे. क्षेत्राची रु.१४२८.८४ लक्षची निधी मागणी, ३०.३७ हे. चा निवाडा जाहीर झालेला असून १२२.२५ हे. क्षेत्र निवाडा स्तरावर आहे. निधी उपलब्धतेनुसार प्राधान्याने भू-संपादनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवलूज - पोर्ले (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४४) ५८५२३ (२६-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा तालुक्यातील १४ गावातील शेतकऱ्यांनी तातडीची गरज ओळखून कासारी नदीवर यवलूज - पोर्ले ठिकाणी सहकार तत्वावर बंधारा बांधला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधारा १९९० च्या सुमारास पाटबंधारे खात्याकडे हस्तांतरित करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याकडे दुर्लक्ष झाल्याने बंधाऱ्याचे ६ दरवाजे खिळखिळे झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर बंधाऱ्यांच्या क्षतिग्रस्त झालेल्या दोन प्रस्तभांची जून, २०१६ मध्ये अत्यावश्यक दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित दुरुस्ती कामांसाठी विशेष दुरुस्ती, विस्तार व सुधारणा अंतर्गत प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदारी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघुपाटबंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४५) ५८५२६ (२६-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदारी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघुपाटबंधारे प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावातील लोकांना शेतीसाठी व उपजीविकेसाठी पाणी मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातून पाणी उपलब्ध होण्याकरिता लघुपाटबंधाऱ्याची डागडुजी करण्याची तसेच गाळ काढण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर लघुपाटबंधाऱ्यांची डागडुजी व गाळ काढण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :** (१) होय.

ल.पा.तलाव नांदारी या प्रकल्पात धरणाची साठवण क्षमता ३.०९ दलघमी असून पाणीवापर ३.०४ दलघमी इतका आहे. या प्रकल्पाचे पाणी ४ को.प. बंधाऱ्यामध्ये सोडून उपसा सिंचनाद्वारे ६ गावातील ४४९ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होतो.

(२) व (३) धरणाचे काम १९९९ मध्ये पूर्ण झाले असून गाळाची क्षमता संकल्पचित्रामध्ये धरणाचे वय ६० वर्षे इतके वय गृहीत धरुन निश्चित केलेली असल्याने गाळा काढण्याची गरज नाही. तथापि शेतकऱ्यांनी गाळ काढून शेतीमध्ये टाकण्यास परवानगी आहे.

धरणाची दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीमधून देखभाल व दुरुस्ती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषदेतील अस्थायी कर्मचाऱ्यांना नियमीत आस्थापनेत सामावून घेण्याबाबत

**(४६) ५८५८६ (२०-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथील जिल्हा परिषदेच्या बांधकाम जलसिंचन विभागात रोजनदारी व कार्यव्यापी आस्थापनेवर काम करणाऱ्या १९३ कामगारांना कायम करण्यात येईल असा शासन निर्णय क्र.काव्यआ-३१८९/सी.आर.२१०/१६ नुसार घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १२२ कर्मचाऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सी.आर.टी. पदाचे लाभ देण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या बांधकाम व जलसिंचन विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याचे निवेदन शासनाकडे माहे एप्रिल, २०१६ मध्ये दिले तसेच या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या आस्थायी कर्मचाऱ्यांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अस्थायी कर्मचाऱ्यांना कायम करुन त्यांना निवृत्ती वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :** (१) होय. या शासन निर्णयामुळे लातूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम जलसिंचन विभागातील रोजंदारी व कार्यव्ययी आस्थापनेवर काम करणाऱ्या १९३ कामगारांना रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास मंजूरी दिलेली आहे.
(२) नाही. सदर १२२ कर्मचाऱ्यांना शासन निर्णय प्राप्त होणेपूर्वीच मारुफ करार स्विकारल्यामुळे त्यांना सी.आर.टी.पदांचे लाभ देण्यात आलेले नाहीत.
(३) होय.
(४) शासन निर्णय क्र. काव्यआ-३१८९/सीआर-२१०/१६ नुसार १९३ कामगारांपैकी ७१ कामगारांना रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यात आलेले आहे. परंतु उर्वरित १२२ कामगारांनी मारुफ करार सिवकारल्यामुळे त्यांना रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यात आलेले नाही.
(५) जिल्हा परिषद लातूर यांनी दिनांक १४/०२/१९८९ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला होता व या प्रस्तावास दिनांक १७/१०/१९८९ अन्वये शासनाने मंजूरी दिलेले आहे. तथापि दरम्यानच्या कालावधीत संघटनेने कालेलकर करार नको मारुफ करारानुसार फायदे द्यावेत असे लेखी दिल्यामुळे संबंधित कामगारांना मारुफ कराराचे फायदे देण्यात आलेली आहेत. तसेच शा.नि.क्र.२००१/प्र.क्र.३००/२००५/आस्था-१०, दि.२७/०६/२००५ च्या शासन निर्णयान्वये "मारुफ करार स्विकारलेल्या कर्मचाऱ्यांना कालेलकर कराराच्या तरतूदी स्विकारण्याची संधी देऊनही त्यांची तसा विकल्प न स्विकारल्याने तसेच मा.उच्च न्यायालयाने देखील कालेलकर कराराच्या तरतूदी लागू करण्यंसबंधीची संबंधित कर्मचाऱ्यांची मागणी फेटाळल्याने उस्मानाबाद, बीड व लातूर या जिल्हा परिषदेमधील मारुफ करार स्विकारलेल्या कर्मचाऱ्यांना कालेलकर कराराच्या तरतूदीचा फायदा अनुज्ञेय होणार नाही" असे निर्देश आहेत. त्यामुळे सदरील १२२ कामगारांना रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर घेऊन कालेलकर करारानुसार लाभ देता आले नाहीत.

---

## वैतरणा (जि.पालघर) नदीतून कोका-कोला कंपनी लाखो लिटर पाण्याचा अवैद्यरित्या वापर होत असल्याबाबत

**(४७) ५८६१९ (१०-०८-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोका-कोला कंपनीच्या (जि.पालघर) कुडूस येथील प्रकल्पात शीतपेयाची विविध उत्पादने तयार करण्यासाठी वैतरणा नदीतून अनधिकृतरित्या प्रचंड पाणी साठा उपसा असल्यामुळे एप्रिल महिन्यापासूनच वाडा तालुक्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एप्रिलच्या सुरुवातीलाच भीषण पाणीटंचाई सुरु झाल्याने शेती व्यवसाय, गुराढोरांचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यामुळे कोका-कोलाचा पाणी उपसा तात्काळ बंद करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोका-कोला कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.

उपअभियंता, जिल्हा परिषद यांचे दि. २५/४/२०१६ अन्वये प्राप्त पत्रानुसार पंचायत समिती, वाडा यांची दि.२०.०४.२०१६ च्या मासिक सभेत एप्रिल, २०१६ मध्ये जाणवणारी पाणी टंचाई विचारात घेता कोकाकोला कंपनीचा पाणीपुरवठा बंद करणेबाबत क्षेत्रिय कार्यालयास कळविले आहे.
(३) व (४) वैतरणा नदीवर कुडूस गावाजवळ वाडा को.प.बंधारा असून त्यामध्ये एकूण २.०० दलघमी पाणीसाठा करण्यात येतो. सन २०१५ च्या पावसाळ्यानंतर पूर्ण पाणीसाठा निर्माण केला होता. त्यातून मंजूर पाणी वापराचे मर्यादेत ०.६१ दलघमी इतका कोकाकोला कंपनीस पाणी पुरवठा करण्यात आला. सिंचनासाठी प्रत्यक्षात ०.८८ दलघमी वापर झाला आहे. तसेच एप्रिल व मे २०१६ मध्ये बंधाऱ्यास पाणी शिल्लक होते.

याबाबत क्षेत्रिय कार्यालयाने स्थानिक भुमिपुत्रांची पिण्यासाठी, गुरा ढोरांसाठी, शेतीसाठी पाण्याची मागणी असल्यास कळविण्याबाबत पंचायत समितीस दि. २५/४/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. पंचायत समिती, वाडा यांच्याकडून कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर मनसर (ता.रामटेक) येथील चक्रधर स्वामी भवन या तिर्थक्षेत्र स्थळाच्या विकास कामास निधी देण्याबाबत**

**(४८) ५८९११ (११-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर मनसर (ता.रामटेक) येथील चक्रधर स्वामी भवन या तिर्थक्षेत्र स्थळाच्या विकास कामास निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी नागपूर यांनी शासनास माहे फेब्रुवारी, २०१६ च्या चौथ्या आठवड्यात दिल्याचा निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने तिर्थक्षेत्र स्थळाच्या विकास कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :** (१) हे खरे आहे. सदर तीर्थक्षेत्रास रु.२.०२ कोटी इतका निधी उपलबध करुन देणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे.

(२) सदर तीर्थक्षेत्रास निधी उपलब्ध करुन देण्यापूर्वी ग्रामीण तीर्थक्षेत्रास विकास योजनेच्या निकषानुसार प्रथम "ब" वर्ग दर्जा देणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर तीर्थक्षेत्रास “ब” वर्ग दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे सजगरा (दि) (ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद) येथे तलावासाठी भूसंपादीत केलेल्या जमिनीवर तलाव निर्माण करण्याबाबत**

**(४९) ५८९५७ (१८-०८-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सलगरा (दि) (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथे सन २००३ मध्ये मांजरा प्रकल्पातंर्गत तलावासाठी जमीन संपादित करुन तेथे अद्याप तलाव निर्माण करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गावात तलाव निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) मौजे सलगार (दि.) (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथे सन २००३ मध्ये मांजरा प्रकल्पांतर्गत तलावासाठी जमिनीचे संपादन केलेले नाही. तथापि मौजे सलगरा (दिवटी) ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद येथे भूसंपादन कार्यवाही पूर्ण करुन साठवण तलावाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँका आणि इतर खाजगी बँकातून जनधन खाते उघडण्यात आले असून यात एका नावाने अनेक खाती उघडली असल्याबाबत**

**(५०) ५९०८१ (१०-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात सुमारे १४ राष्ट्रीयकृत बँका आणि इतर खाजगी बँकातून सुमारे साडेपाच लाखाहून अधिक जनधन खाते उघडण्यात आले असून यात एका नावाने अनेक खाती उघडली असल्याने एकूण खात्यापैकी सुमारे ३५ टक्के खाती निष्क्रिय असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खात्यांमुळे येथील नागरिकांना कोणत्याच शासकीय सवलतीचा फायदा झाल्याचे दिसून येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या जनधन खात्यासंदर्भात शासनानी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-११-२०१६) :**(१) वित्तीय सेवा विभाग, भारत सरकार यांचेकडून औरंगाबाद जिल्ह्यासाठी खालीलप्रमाणे आकडेवारी उपलब्ध झाली आहे. एका नावाची अनेक खाती वा निष्क्रिय खात्यांबद्दल वेगळी आकडेवारी उपलब्ध नाही.
(i) उघडली गेलेली खाती - ४,९९,६२९
(ii) या खात्यांमध्ये शिल्लक (रु.लाखात) - ५,१०४.७५
(iii) शून्य शिल्लक खाती - १,६९,०६५
(iv) रुपे कार्ड दिली गेलेली खाती - ४,२०,३२२
(v) आधार नोंदणी झालेली खाती - ३,६४,२२४
(२) व (३) शासकीय सवलतींचे लाभ लाभार्थीच्या खात्यात आधार क्रमांकाच्या आधारे थेट जमा करण्यात येतात. वर दिलेल्या आकडेवारीनुसार, ओरंगाबाद जिल्ह्यात उघडल्या गेलेल्या खात्यापैकी ७३ टक्के खात्यांना आधार क्रमांक जोडला गेला असल्याचे दिसून येते व उर्वरित सर्व खात्यांना आधार जोडणीचे काम सुरु आहे. बचत खाती उघडून त्यांना आधार क्रमांकाची जोडणी करणे ही शासकीय सवलतींचा लाभ मिळण्याची पूर्व तयारी आहे. शासनामार्फत काही योजनांचा थेट हस्तांतरण लाभ सुरु करण्यात आला आहे व त्यात नवनवीन योजनांचा समावेश करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.